# इक्विटास बँकेद्वारे देशातील पहिले स्वयंसेवा फास्टटॅग

व्यापार प्रतिनिधी, मुंबई

**इक्विटास या** लघू आकारातील बँकेकडून देशभरात पहिल्यांदाच डिजिटल पेमेंटच्या धर्तीवर सेवा सादर करण्यात आली आहे. तमिळनाडूतील या पहिल्या खासगी क्षेत्रातील बँकेने पहिल्यांदाच स्वयं सेवा सुविधा ग्राहकांसाठी सादर केली आहे.

याद्वारे वाहनांसाठी फास्टटॅग (आरएफआयडी स्टीकर) उपलब्ध करून देण्यात आले आहे. तसेच ऑनलाइन नोंदणी करून देयके भरण्याची सुविधा याद्वारे प्राप्त होते. यामुळे ग्राहकांना फास्टटॅग स्टीकर कुठल्याही त्रासाशिवाय उपलब्ध करून देण्यात येत आहे. इक्विटास ही पहिली लघू बँक असून फास्टटॅग देणाऱ्या देशातील सात बँकांपैकी एक आहे. तिने एनपीसीआयच्या युनिफाइड पेमेंट इंटरफेसचे एकीकरण करून वॉलेटही सादर केले आहे. इक्विटास फास्टटॅग हा राष्ट्रीय महामार्गावरील प्रवासासाठीचा पर्याय आहे. यामुळे पथकर स्वयंचलित पद्धतीने कापला जातो आणि चालकाला पथकर नाक्यावरून कुठल्याही रोख रकमांच्या व्यवहाराशिवाय जाता येते. आजच्या घडीला इक्विटास बँकेने ५,००० हून अधिक फास्टटॅग जारी करण्यात आले आहेत आणि मार्च २०१८ पर्यंत ५ लाख इटीसी टॅग दिले जावेत, असे ध्येय जाहीर करण्यात आले आहे.